महावितरण [TM]
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
(महाराष्ट्र शासन उपक्रम)
सीआयएन : यु४०१०९एमएच२००५एसजीसी१५३६४५
दुरध्वनी क्र. २६४७४७५३ (वै)/२६४७४२११ (का)
फॅक्स क्र. २६४७२३६६
ईमेल : cecomm@mahadiscom.in
संकेतस्थळ : www.mahadiscom.in
प्लॉट क्र. जी-९, प्रकाशगड
प्रो. अनंत कान्हेकर मार्ग,
वांद्रे (पूर्व)
मुंबई- ४०० ०५१

क्र. मु.अ.(वा)/लेखा/ग्रा.पं.दिवाबत्ती/५५/२०१५-१६/ 008042 दिनांक : 15 MAR 2016

## परिपत्रक क्र. 225

**विषयः-** ग्रामपंचायतीना रस्त्यावरील विजेच्या दिव्यांच्या वीज बिलांची रक्कम देण्यासाठी सन २०१५-१६ या आर्थिक वर्षासाठी अनुदानापोटी मंजुर केलेली रक्कम रु. ११,४०,००,०००/- (रुपये अकरा कोटी चाळीस लाख फक्त).

**संदर्भः-** १) शासन निर्णय क्र. बीजीटी-२६०३/प्र.क्र.-१९९२/पंरा-४ दि.२२.०९.२००३.
२) शासन निर्णय क्र. अर्थसं-२०१५/प्र.क्र.२२/वित्त-२ दि.१४.५.२०१५.
३) क्र. मु.अ.(वा)/लेखा/ग्रा.पं.दिवाबत्ती/५५/२०१५-१६/३००४३ दि.०३.०८.२०१५.
४) शासन निर्णय क्र. अर्थसं-२०१५/प्र.क्र.२२/वित्त-२ दि.१९.०१.२०१६.
५) क्र. मु.अ.(वा)/लेखा/ग्रा.पं.दिवाबत्ती/५५/२०१५-१६/७४५९ दि.०५.०३.२०१६.
६) शासन निर्णय क्र. अर्थसं-२०१५/प्र.क्र.२२/वित्त-२ दि.०९.०२.२०१६.

----------------------------

ग्रामपंचायतीच्या हद्दीतील रस्त्यांवरील दिवाबत्तीची विज देयके भागविण्यासाठी शासन ग्रामपंचायतींना १०० टक्के अनुदान देते. सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात सदर अनुदानासाठी रक्कम रुपये २२८,००,००,०००/- (रुपये दोनशे अठावीस कोटी फक्त) इतकी तरतुद शासकीय अर्थसंकल्पात करण्यात आलेली आहे, त्यापैकी खालीलप्रमाणे शासन निर्णयानुसार महावितरण कंपनीस रक्कम प्राप्त झालेली आहे.

| | |
|---|---|
| १) शासन निर्णय क्र. अर्थसं-२०१५/प्र.क्र.२२/वित्त-२ दि.१४.५.२०१५ (वाणिज्य परिपत्रक क्र.२२० दि.०३.०८.२०१५) | रक्कम रु.१५९,६०,००,०००/- |
| २) शासन निर्णय क्र. अर्थसं-२०१५/प्र.क्र.२२/वित्त-२ दि.१९.०१.२०१६ (वाणिज्य परिपत्रक क्र.२२४ दि.०५.०३.२०१६) | रक्कम रु.३४,२०,००,०००/- |
| | **एकूण रु.१९३,८०,००,०००/-** |

सदर मंजुर रक्कमेतील रु. ११,४०,००,०००/- (रुपये अकरा कोटी चाळीस लाख फक्त) इतकी तरतुद वरील संदर्भिय शासन निर्णया सोबत जोडलेल्या जिल्हानिहाय विवरणपत्रात दर्शविल्याप्रमाणे शासनाकडून, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादितला रोखीत प्राप्त झाले आहे.

शासन निर्णयासोबत जोडलेल्या जिल्हानिहाय विवरण पत्रातील रक्कमेचे, संबंधीत जिल्हयातील ग्रामपंचायतीच्या नावाने थकबाकीच्या प्रमाणात वर्ग करण्याबाबत संबंधितांनी जरुरती कार्यवाही करावी.

थकबाकी पोटी समायोजित करण्यात आलेल्या रक्कमेचे (सन २०१५-१६) ग्रामपंचायत निहाय विवरण पत्राची एक प्रत संबंधित जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, मुख्य लेखा वित्त अधिकारी तसेच विभागीय आयुक्त व उपसचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांच्यासह या कार्यालयास त्वरित पाठवावी.

**सोबत :** वरीलप्रमाणे

15-3-16
**मुख्य अभियंता (वाणिज्य)**

**प्रत सविनय सादर :-**
संचालक (वित्त), म.रा.वि.विं.कं. मर्यादित, प्रकाशगड, बांद्रा (पू), मुंबई.

**प्रत सस्नेह रवाना :-**
१. सर्व मुख्य अभियंते, म.रा.वि.वि.कं. मर्यादित, संवसु परिमंडळ कार्यालये, माहिती व उचित कार्यवाहीसाठी
२. मुख्य महाव्यवस्थापक (निगम वित्त), म.रा.वि.वि.कं. मर्यादित, मुंबई.

**प्रत रवाना :**
१. सर्व अधिक्षक अभियंते, संवसु मंडळ कार्यालये, म.रा.वि.वि.कं. मर्यादित
२. महाव्यवस्थापक (वि.व ले.अर्थोपाय), ५ रा मजला, प्रकाशगड, , मुंबई-५१.
३. सर्व कार्यकारी अभियंते, संवसु विभागीय कार्यालये, म.रा.वि.वि.कं. मर्यादित
४. सर्व उपकार्यकारी अभियंते / सहाय्यक अभियंते, संवसु उपविभागीय कार्यालये.
---- उचित कार्यवाहीसाठी.

\Vaze\Acctts\Circular\Circular Streetlight 2016.doc

अर्थसंकल्पीय अनुदान सन २०१५-२०१६
मागणी क्र. एल -५ लेखाशिर्ष ३६०४ - स्थानिक संस्था व पंचायत राज संस्था यांना नुकसान भरपाईच्या व अभिहस्तांकित रकमा देणे.२००इतर संकीर्ण नुकसान भरपाईच्या व अभिहस्तांकित रकमा देणे- (०१)(०३) रस्त्यावरील विजेच्या दिव्यांची वीज बिलांची रक्कम देण्यासाठी ग्राम पंचायतीना १०० % अनुदान (३६०४०३२५) (दत्तमत)

# महाराष्ट्र शासन
## ग्राम विकास विभाग
## शासन निर्णय क्रमांकः अर्थसं-२०१५/प्र.क्र.२२ /वित्त-२

बांधकाम भवन इमारत- २५, मर्झबान पथ,
फोर्ट, मुंबई-४०० ००१
तारीख: ०९ फेब्रुवारी, २०१६

वाचा -

१) शासन निर्णय क्रमांकः ग्राम विकास विभाग क्र. व्हीपीएम २०८५/सीआर ११९०/२२ दि . ३० जानेवारी, १९९०
२) शासन निर्णय क्रमांकः ग्राम विकास विभाग क्र. बीजीटी-२६०३/प्र.१९१२/पंरा-४ दि.२२ सप्टेंबर, २००३
३) शासन निर्णय क्रमांकः ग्राम विकास विभाग क्र.अर्थसं २०१५/प्र.क्र.२२ /वित्त-२ दि. १४ मे, २०१५

**प्रस्तावना-**

ग्रामपंचायतीच्या हद्दीतील रस्त्यांवरील दिवाबत्तीची वीज देयके भागविण्यासाठी ग्रामपंचायतींना १०० टक्के अनुदान देण्यात येते. यासाठी सन २०१५-२०१६ या आर्थिक वर्षात वर्षाकरीता रु.२२८,००,००,०००/- (अक्षरी रुपये दोनशे अठ्ठावीस कोटी फक्त ) इतक्या रकमेची अर्थसंकल्पीय तरतूद केलेली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांची दिवाबत्तीची देयके त्वरित भागविण्यासाठी प्रशासकीय विभागांनी शासकीय अनुदानातून परस्पर सदर रक्कम महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाकडे भरणा करावी असा निर्णय शासनाने सन २००३ या वर्षी घेतलेला आहे.

**शासन निर्णय-**

ग्रामपंचायतीच्या हद्दीतील रस्त्यांवरील दिवाबत्तीची वीज देयके भागविण्यासाठी ग्रामपंचायतींना १०० टक्के अनुदान (३६०४०३२५) या लेखाशिर्षाखाली सन २०१५-२०१६ या आर्थिक वर्षाकरीता रु.२२८,००,००,०००/- (अक्षरी रुपये दोनशे अठ्ठावीस कोटी फक्त ) इतकी तरतूद अर्थसंकल्पित

करण्यांत आली आहे,यापैकी ८५ % च्या मर्यादेत रु.१९३,८०,००,०००/-इतके अनुदान वितरित केले आहे.

१. वित्त विभाग शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१५/प्र.क्र.८५/अर्थसंकल्प-३ दि. ०६ फेब्रुवारी, २०१६ च्या परिपत्रकान्वये अर्थसंकल्पीय तरतुदीच्या ९० % च्या मर्यादेत वितरणास मान्यता देण्यात आली आहे. तसेच सम क्रमांकाचे वित्त विभाग, शासन परिपत्रक दि. १७ एप्रिल, २०१५ मधील परिच्छेद ७ ते १८ मधील अटी व शर्ती आणि परिशिष्ट मधील अटी व शर्तीची पुर्तता होत असल्याने अर्थसंकल्पीय तरतूदीपैकी ०५% च्या मर्यादेत रु. **११,४०,००,०००/- (अक्षरी रुपये अकरा कोटी चाळीस लक्ष फक्त )** इतके अनुदान अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीवर (BEAMS) उपलब्ध करुन देण्यास व वितरीत करण्यास मान्यता देण्यात आली आहे. सदर तरतूद सोबतच्या विवरणपत्रात जिल्हानिहाय दर्शविलेल्या विगतवारीप्रमाणे महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, मुंबई यांचेकडे सुपूर्द करण्याचा निर्णय शासनाने घेतला असून ती आता या शासन निर्णयाव्दारे कार्यासन अधिकारी, रोखशाखा, ग्राम विकास व जलसंधारण विभाग मंत्रालय, यांचे अधिनस्त ठेवण्यात येत आहे. सदरचा निधी अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई येथून आहरित करुन वितरित करण्यासाठी त्यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्यांनी उपरोक्त मंजूर करण्यात आलेल्या अनुदानाचा धनादेश महाराष्ट्र राज्य, विद्युत वितरण कंपनी मर्यादित, मुंबई यांच्या नावाने अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई येथून काढावयाचा आहे. श्री. वि.म. राउत, कार्यासन अधिकारी, रोखशाखा यांच्या सहीने तयार केलेले व श्री. नं. म.शिंदे, सहसचिव (रोखशाखा) ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी प्रतिस्वाक्षरीत केलेले देयक अधिदान व लेखाकार्यालय, मुंबई यांचेकडे सादर करण्यात यावे.

२. या करीता रु. **११,४०,००,०००/- (अक्षरी रुपये अकरा कोटी चाळीस लक्ष फक्त )** इतक्या अनुदानास मंजूरी देण्यात येत आहे. इतके अनुदान खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, मुंबई यांचेकडे सुपूर्द करण्यात येत आहे.

अ) महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित , मुंबई यांना दिलेल्या धनादेशाची रक्कम त्यांनी या शासन निर्णयासोबतच्या विवरण पत्रातील रकाना क्र. ३ मधील रक्कम त्या त्या जिल्हा परिषदांच्या अखत्यारीत असलेल्या ग्रामपंचायतीच्या रस्त्यावरील दिवाबत्तीच्या वीज देयकाच्या थकबाकीस अधीन राहून समायोजित करावी व तसा अहवाल शासनास सादर करावा.

ब) समायोजित केलेल्या रक्कमेबाबतचे स्वतंत्र विवरणपत्र महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित , मुंबई यांनी ठेवणे आवश्यक असून त्याची एक प्रत त्यांनी संबंधित जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी, मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांना पाठवावयाची आहे. तसेच त्याची एक प्रत शासनालाही पाठवावयाची आहे.

क) वरील अटींची पूर्तता होत आहे याची खात्री करुन घेण्यासाठी महालेखापाल, महाराष्ट्र -१ , मुंबई आणि महालेखापाल , महाराष्ट्र -२, नागपूर यांना लेखापरिक्षणाकरिता महाराष्ट्र राज्य विद्युत

वितरण कंपनी मर्यादित , मुंबई यांची पुस्तके व लेखा पाहणीचा अधिकार राहील. महालेखापाल यांना त्यांचे काम पार पाडण्याकरीता महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित , मुंबई यांनी सर्वतोपरी सहकार्य दिले पाहिजे.

ड) खर्चाचा मेळ घालण्यासाठी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित , मुंबई यांनी खर्चाची विवरणपत्रे विभागीय आयुक्तांना पाठवून त्याची एक प्रत शासनास पाठवावी.

विभागीय आयुक्तांनी शासन परिपत्रक ग्राम विकास विभाग क्र. आरसीएन १०८९/प्र.क्र.३०२७/२८, दि. ५.९.९० मधील सूचनेप्रमाणे या अनुदानाच्या खर्चाचा महालेखापालांकडे नोंदलेल्या खर्चाबरोबर मेळ घालावा व अहवाल शासनाकडे पाठवावा.

३. उपरोक्त निधीबाबत नियंत्रक अधिकारी म्हणून श्री. नं. म. शिंदे, सह्सचिव (रोखशाखा ) ,ग्राम विकास व जलसंधारण विभाग हे राहतील .

४. या शासन निर्णयाव्दारे मंजूर करण्यात आलेल्या अनुदानाएव्ढा खर्च मागणी क्र.एल-५, "३६०४" स्थानिक संस्था व पंचायत राज संस्था यांना नुकसान भरपाईच्या व अभिहस्तांकित रकमा देणे. २०० इतर संकीर्ण नुकसानभरपाईच्या व अभिहस्तांकित रकमा देणे (०१) (०३) रस्त्यावरील विजेच्या दिव्यांची वीज बिलाची रक्कम देण्यासाठी ग्रामपंचायतींना १०० टक्के अनुदान देणे (३६०४०३२५) (दत्तमत)-५० -इतर खर्च या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो उपरोक्त लेखाशिर्षाखाली सन २०१५-२०१६ या आर्थिक वर्षासाठी असलेल्या अर्थसंकल्पिय तरतूदीतून भागविण्यात यावा.

५. हा शासन निर्णय वित्त विभाग शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१५/प्र.क्र.८५/अर्थ-३ दि. ०६ फेब्रुवारी, २०१६ नुसार निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(पां.रा. खोटरे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परिक्षा) महाराष्ट्र-१, मुंबई -४०० ००१ वर नमूद केल्याप्रमाणे तीन प्रतीत माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी.
२. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई ४०० ००१
३. महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई ४०० ००१
४. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-२, नागपूर .

५. महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-२, नागपूर
६. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,प्रकाशगड,वांद्रे (पूर्व), मुंबई -४०० ००५१
७. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित प्रकाशगड अनंत काणेकर मार्ग, वांद्रे ( पूर्व ) मुंबई ४०० ०५१.
८. मुख्य अभियंता (वाणिज्य), महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, प्रकाशगड (वाणिज्य विभाग) ५ वा मजला, अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पू), मुंबई ४०० ०५१
९. अधिदान व लेखा अधिकारी, महाराष्ट्र राज्य (अराप/रालेवि-१), मुंबई.
१०. निवासी लेखा अधिकारी, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कपंनी मर्यादित, प्रकाशगड, वांद्रे (पूर्व), मुंबई.
११. मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा , कोकण भवन , वाशी , नवी मुंबई
१२. उप लेखा परिक्षक , नवी मुंबई , वाशी /पुणे/नाशिक/अमरावती/औरंगाबाद/नागपूर
१३. मुख्य अभियंता, विद्युत विभाग, महाराष्ट्र शासन, प्रशासकीय इमारत, ५९ रामकृष्ण चेंबूरकर मार्ग, चेंबूर,मुंबई ४०० ०७१
१४. अवर सचिव (उर्जा -३) उद्योग उर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई -३२
१५. विभागीय आयुक्त (सर्व)
१६. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
१७. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी.
१८. सर्व जिल्हा परिषदांचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत)
१९. कार्यासन अधिकारी, ग्राम विकास व जलसंधारणविभाग (वित्त -१, वित्त- ७, वित्त -८)
२०. कक्ष अधिकारी (रोखशाखा) ग्राम विकास व जलसंधारण विभाग,मंत्रालय, मुंबई.३२.
२१. वित्त विभाग (अर्थसंकल्प १७ /व्यय१५)मंत्रालय, मुंबई.३२.
२२. निवडनस्ती ,वित्त-२ ग्राम विकास व जलसंधारण विभाग.

## विवरणपत्र

शासन निर्णय क्र अर्थसं २०१५/प्र.क्र.-२२ /वित्त-२, दिनांक: - ०९ फेब्रुवारी, २०१६ चे विवरणपत्र

मागणी क्र. एल -५ लेखाशिर्ष ३६०४ - स्थानिक संस्था व पंचायत राज संस्था यांना नुकसान भरपाईच्या व अभिहस्तांकित रक्मा देणे. २००, इतर संकीर्ण नुकसान भरपाईच्या व अभिहस्तांकित रकमा देणे- (०१) (०३) रस्त्यांवरील विजेच्या दिव्यांच्या देयकांची रक्कम भरण्यासाठी ग्रामपंचायतीना १००%अनुदान (३६०४०३२५) (दत्तमत) -५० इतर खर्च.

(रुपये /हजारात)

| अ.क्र. | जिल्हा परिषद | या शासन निर्णयान्वये वितरित करण्यांत येत असलेले अनुदान | |
|---|---|---|---|
| १ | ठाणे | २१८५ | (रुपये एकवीस लक्ष पंच्याऐंशी हजार फक्त) |
| २ | रायगड | १८०३ | (रुपये अठरा लक्ष तीन हजार फक्त) |
| ३ | रत्नागिरी | ७१० | (रुपये सात लक्ष दहा हजार फक्त) |
| ४ | सिंधूदुर्ग | ८३ | (रुपये त्र्याऐंशी हजार फक्त) |
| ५ | नाशिक | ८८२० | (रुपये अठ्ठयाऐंशी लक्ष वीस हजार फक्त) |
| ६ | धुळे | १७२ | (रुपये एक लक्ष बाहत्तर हजार फक्त) |
| ७ | नंदूरबार | १५३ | (रुपये एक लक्ष त्रेपन्न हजार फक्त) |
| ८ | जळगांव | ९४३५ | (रुपये चौ-याण्णव लक्ष पस्तीस हजार फक्त) |
| ९ | अहमदनगर | ९३७६ | (रुपये त्र्याण्णव लक्ष शहाहत्तर हजार फक्त) |
| १० | पुणे | ७५९५ | (रुपये पंच्याहत्तर लक्ष पंच्याण्णव हजार फक्त) |
| ११ | सातारा | ४७१ | (रुपये चार लक्ष एकाहत्तर हजार फक्त) |
| १२ | सांगली | २९६ | (रुपये दोन लक्ष शहाण्णव हजार फक्त) |
| १३ | सोलापूर | १४३२२ | (रुपये एक कोटी त्रेचाळीस लक्ष बावीस हजार फक्त) |
| १४ | कोल्हापूर | ४२० | (रुपये चार लक्ष वीस हजार फक्त) |
| १५ | औरंगाबाद | ५७२७ | (रुपये सत्तावन्न लक्ष सत्तावीस हजार फक्त) |
| १६ | जालना | ३५८८ | (रुपये पस्तीस लक्ष अठ्ठयाऐंशी हजार फक्त) |
| १७ | परभणी | ११११ | (रुपये अकरा लक्ष अकरा हजार फक्त) |
| १८ | हिंगोली | १४०० | (रुपये चौदा लक्ष फक्त) |
| १९ | बीड | ५६ | (रुपये छप्पन हजार फक्त) |
| २० | नांदेड | १३७५९ | (रुपये एक कोटी सदतीस लक्ष एकोणसाठ हजार फक्त) |
| २१ | उस्मानाबाद | ३९८ | (रुपये तीन लक्ष अठ्ठयाण्णव हजार फक्त) |
| २२ | लातूर | १७८३ | (रुपये सतरा लक्ष त्र्याऐंशी हजार फक्त) |

| अ.क्र. | जिल्हा परिषद | या शासन निर्णयान्वये वितरित करण्यांत येत असलेले अनुदान | |
|---|---|---|---|
| २३ | बुलढाणा | ९१३९ | (रुपये एक्याण्णव लक्ष एकोणचाळीस हजार फक्त) |
| २४ | अकोला | १४४४ | (रुपये चौदा लक्ष चव्वेचाळीस हजार फक्त) |
| २५ | वाशिम | १०७३ | (रुपये दहा लक्ष त्र्याहत्तर हजार फक्त) |
| २६. | अमरावती | १४०२ | (रुपये चौदा लक्ष दोन हजार फक्त) |
| २७ | यवतमाळ | १४२९८ | (रुपये एक कोटी बेचाळीस लक्ष अठ्ठयाण्णव हजार फक्त) |
| २८ | वर्धा | २१२ | (रुपये दोन लक्ष बारा हजार फक्त) |
| २९ | नागपूर | १७४३ | (रुपये सतरा लक्ष त्रेचाळीस हजार फक्त) |
| ३० | भंडारा | ८२३ | (रुपये आठ लक्ष तेवीस हजार फक्त) |
| ३१ | गोंदिया | ९२ | (रुपये ब्याण्णव हजार फक्त) |
| ३२ | चंद्रपूर | ३९ | (रुपये एकोणचाळीस हजार फक्त) |
| ३३ | गडचिरोली | ७२ | (रुपये बाहत्तर हजार फक्त) |
| | एकूण | ११४००० | (अक्षरी रुपये अकरा कोटी चाळीस लक्ष फक्त) |

(पां.गं. खोटरे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.